# राज्यपालांकडून लवकरच कुलगुरूंची नियुक्ती

- दोन दिवसात पाच उमेदवारांच्या मुलाखती होण्याची शक्यता
- नूतन कुलगुरू कोण? याबाबत विद्यापीठ वर्तुळात उत्सुकता



प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू नियुक्तीची प्रक्रिया मार्च महिन्यापासून सुरू आहे. प्राप्त अर्जाच्या छाननीनंतर कुलगुरू पदासाठी २५ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यापैकी पाच उमेदवारांची नावे कुलगुरू शोध समितीचे सदस्य मिलींद म्हैसकर यांनी कुलपती कार्यालयाला सादर केली आहेत. या पाच उमेदवारांच्या मुलाखती राज्यपालांकडून येत्या दोन दिवसात होण्याची शक्यता आहे. या मुलाखतीनंतर लवकरच शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंची नियुक्ती होणार आहे. त्यामुळे पाच उमेदवारपैकी नूतन कुलगुरू कोण असणार याबद्दल विद्यापीठ वर्तुळाला उत्सुकता आहे.

कुलगुरू शोध समितीकडून राज्यपालांकडे पाच उमेदवारांची नावे सादर केली आहेत. या पाचपैकी एका उमेदवाराची नियुक्ती विद्यापीठाच्या कुलगुरूपदी केली जाणार आहे. या पाच उमेदवारांच्या मुलाखती राज्यपाल कधी घेणार याकडे शिक्षण वर्तुळाचे लक्ष लागले आहे. २५ उमेदवारांमध्ये विद्यापीठातील माजी प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, पदार्थविज्ञान विभागातील डॉ. व्ही. जे. फुलारी, सांगलीतील पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. आर. व्ही. शेजवळ या चार उमेदवारांच्या मुलाखती झाल्या आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील स्थानिक कुलगुरू मिळणार का? याबद्दल विद्यापीठ वर्तुळात उत्सुकता आहे.

# डी. टी. शिर्के, देसाई, काळे, कुंभार, अंजली कुरणे यांचा समावेश

# दोन दिवसांत होणार पाच जणांच्या मुलाखती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी राज्यपाल कार्यालयाकडे पाठविण्यात आलेल्या पाच नावांमध्ये डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नितीन देसाई, डॉ. कारभारी काळे, डॉ. अविनाश कुंभार, डॉ. अंजली कुरणे यांचा समावेश असल्याचे राजभवनावरील सूत्रांकडून समजते. या पाच जणांच्या दोन दिवसांत मुलाखती होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यापैकी कुलगुरूपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

## कुलगुरू निवड



डॉ. देवानंद शिंदे यांची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या कुलगुरू पदासाठी निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली. कोरोनाच्या संसर्गामुळे ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आली. कुलगुरूपदासाठी १६९ इच्छुकांचे अर्ज आले होते. कुलपती कार्यालयाकडून कुलगुरू निवड प्रक्रियेंतर्गत त्रिसदस्यीय शोध समिती नेमण्यात आली. कुलगुरू शोध समितीने अर्ज आलेल्या १६९ यापैकी पात्र असलेल्या २५ उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. या २५ उमेदवरांपैकी ५ उमेदवारांची नावे कुलगुरू शोध समितीचे शासन प्रतिनिधी मिलिंद म्हैसकर यांनी कुलपती कार्यालयास पाठवली. या पाच लोकांच्या मुलाखती दोन दिवसांत होण्याची शक्यता आहे.